**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.२९८४ दि. १४/०९/२०१९**

## उत्तमनगर पोलिस ठाणे पुणे शहर

## पोलीसांनी फिल्मी स्टाईलने वाचवले युवकाचे प्राण

रात्रौ ०२.०० वाजताची वेळ.पोलीस नेहमी प्रमाणे शिंदे पुल, शिवणे येथे नाकाबंदी करीत असताना एक युवक पोलीसाजवळ पळत पळत येतो व घाबरत सुरु असलेला व्हिडीओ कॉल दाखवतो. एक इसम हा गळफास घेत होता. पंख्याला साडी गुंडाळत होता. त्या साडीत आपल्या मानेला अडकवणेचा प्रयत्न करीत होता. पोलींसांनी त्या मुलास विचारले हा कोण आहे व कोठे फाशी घेण्याचा प्रयत्न करीत आहे तेव्हा त्या मुलाने सांगीतले की, जवळच असलेल्या स्नेहा अपार्टमेंन्ट, दांगट इस्टेट, शिवणे असे सांगताच पोलीस त्या मुलास घेवून पळत सुटले. नाकाबंदी पांईट पासुन ०१ कि.मि.अंतरावर असलेल्या स्नेहा अपार्टमेंन्ट मध्ये घुसले. फाशी घेणारा मुलगा ०५ व्या मजल्यावर राहणेस होता. तर सोसायटीची लिप्ट तळमजल्यावर नव्हती. व बटन दाबुन ही लवकर येत नव्हती. सर्व पोलीस जिन्याने पळत पाचव्या मजल्यावर पोहचले. दरवाजा आतुन बंद होता.दरवाजा वाजवूनही तो उघडत नव्हता.मग दरवाजा तोडुन घरात पोलीसांनी प्रवेश केला तर तो नुकताच लटकला होता. पोलीसांनी त्याला अलगद खालुन आधार देवून खाली उतरवुन घेतले. त्यास पाणी पिण्यास दिले. तो रडायला लागला. त्यास मानसिक आधार दिला व आत्महत्येचे नक्की कारण विचारले तेव्हा तो बेरोजगारी व घरच्या लोकांशी झालेल्या तत्कालीन भांडणावरुन त्यास सोडुन निघुन गेले म्हणून जिवनाला कंटाळला होता. त्याचेशी अर्धा तास चर्चा केल्यानंतर तो शांत झाला. त्यास संकटावर कशी मात करायची व नव्या उमेदीने कसे जगायचे हे पोलीसांनी सांगीतले. त्याने त्याच्या आयुष्याची नवी सुरवात करण्याचे आश्वासन दिले आहे. त्याचा जिव वाचवून त्याच्यात सकारात्मता निर्माण केली म्हणून पोलीस ही आंनदी होते. पोलीसांनी ०१ जिव वाचवला होता.

उत्तमनगर पोलीस ठाणेचे पोलीस उप निरीक्षक नितीन शिंदे, पो हवा भोंडेंकर पो ना अजित शेंडगे यांनी ही कौतुकास्पद कामगीरी केली आहे. उत्तमनगर पोलीस वरिष्ठ पोलीस निरीक्षक उदयसिंग शिंगाडे यांनी सर्व टिमचे मनापासुन कौतुक केले आहे. नागरीकांनी ही पोलींसाच्या कामाचे कौतुक केले आहे. आज दिवसभात याच प्रकरणाची चर्चा नागरीकांत व पोलीस ठाणेत सुरु होती.



Hav.Dattaram Bhindekar



P.N. shendge


उत्तमनगर पोलीस ठाणे, पुणे शहर
(020) 25290029
अंकीत
एन.डी.ए. पोलीस चौकी
महाराष्ट्र पोलीस
सौजन्य : श्री. कैलास अशोकराव कुऱ्हाडे (पाटील)
2019/7/11 13:07

PSI . Shinde